# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक १३/१०/२०२२ (गुरूवार)**

**(दुपार)**

---

### जबरी संभोग

**पो.स्टे. बुटीबोरी:–** माहे मे २०२२ चे सुमारास वय १४ वर्षीय पीडित/ फिर्यादी ही घरी एकटी असतांना आरोपी नामे– अक्षय संजय मडावी, वय २१ वर्ष, रा.सालई ता. हिंगणा जि. नागपुर ह.मु. भान्सुली ता.जि.नागपुर हा तिचे घरी मोटरसायकलची चाबी मागण्याकरिता बहाण्याने आला व घरात घुसला असता फिर्यादीने ओरडण्याचा प्रयत्न केल्याने तिला जीवे मारण्याची धमकी देवुन तिचेशी जबरीने शारीरिक सबंध प्रस्थापीत करून कोणाला काही सांगीतल्यास जिवाने मारण्याची धमकी दिली. त्यामुळे फिर्यादी घाबरून आजपर्यंत चुप होती. तिला मासीक पाळी येत नसल्याने तिचे आई वडीलांनी महीला डॉक्टरकडे नेले असता अल्पवयीन मुलगी पाच महीन्याची गर्भवती असल्याचे माहीती पडल्याने आज रोजी फिर्यादी मुलगी तिचे आई वडीलांसह पो.स्टे. बोरी ला हजर येवुन रिपोर्ट दिल्याने पो.स्टे. बोरी ला अप क्र. ६३०/२२ कलम ३७६(३),५०६ भादवि सहकलम ४ पोक्सो ॲक्ट अन्वये नोंद असुन तपासात आहे. आरोपीला अटक करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि आरती उघडे मो.क्र. ८३५५९४७४७३ या करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. कळमेश्वर –** दिनांक ०९/१०/२०२२ चे १८.०० वा. चे सुमारास पो.स्टे. कळमेश्वर हद्दीत फिर्यादी यांची १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला आरोपी नामे– सिध्दार्थ याने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रकाश हिवरकर मो.क्र. ९८८१५९५९९९ हे करीत आहे.

### . विश्वासघात करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. मौदा :–** अंतर्गत वडोदा कामठी येथे दि. १२/१०/२०२२ चे १६.०० वा. सुमारास अज्ञात आरोपी याने फिर्यादी नामे– चेतन गणेश सराटकर, वय १९ वर्ष, रा. वडोदा ता. कामठी, जि. नागपुर यास दुसऱ्याचा मोबाईल फोन वरून फोन करून 'मी ओलेक्स कंपनीचा माणुस आहे, तुमची गाडी मला विकत घ्यायची आहे' असे म्हणुन एमएच– ४०/एवाय– ६३८४ क्रमांकाची मोटरसायकल कि. ४०,०००/–रू. ची विश्वासघात करून पळुन नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी सोनेकर मो.क्र. ८९७५९२१७७० हे करीत आहे.


**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**